# Dr. Abhijeet Kadam from Chhatrapati Sambhajinagar Honoured with 'Loksatta Tarun Tejankit Award 2025' for Excellence in Scientific Research

**Chhatrapati Sambhajinagar:** Bringing pride to the city through his remarkable contribution to science and research, Dr. Abhijeet Kadam has been honoured with the prestigious **"Loksatta Tarun Tejankit Award 2025."** This esteemed award is presented by *Loksatta* to recognize young achievers across the country who have demonstrated excellence, innovation, and leadership in their respective fields.

The award ceremony was held at the grand venue of *ITC Grand, Mumbai*, in the presence of distinguished guests from various sectors. Dr. Kadam received the honour at the hands of Hon'ble Mr. Ashish Shelar, Cultural Minister of Maharashtra. The event witnessed the participation of eminent personalities from academia, industry, administration, and social sectors, celebrating the achievements of outstanding young individuals. Dr. Abhijeet Kadam is currently working as an Assistant Professor in the Department of Physics at CSMSS Chh. Shahu College of Engineering, Chhatrapati Sambhajinagar. His research primarily focuses on luminescent materials, phosphors, and solar cell technologies. Through his dedicated efforts, he has made noteworthy contributions to the field of materials science, with his research gaining recognition at both national and international levels.

The "Loksatta Tarun Tejankit" Award aims to encourage young talent and acknowledge individuals who are contributing meaningfully to society through innovation and excellence. It serves as a platform to highlight inspiring journeys and motivate the younger generation to pursue impactful work. Dr. Kadam's achievement has brought recognition not only to his institution but also to Chhatrapati Sambhajinagar. His work continues to inspire students and aspiring researchers, encouraging them to engage in scientific exploration and innovation.


लोकसत्ता.com


लोकसत्ता.com
INDIAN EXPRESS GROUP
लोकमान्य लोकशक्ती

# डॉ. अभिजीत कदम यांना 'लोकसत्ता तरुण तेजांकित २०२५' पुरस्कार; विज्ञान संशोधनातील उल्लेखनीय कार्याची राज्यस्तरीय दखल

छत्रपती संभाजीनगर : विज्ञान व संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करून शहराचे नाव उज्ज्वल करणारे युवा संशोधक डॉ. अभिजीत कदम यांना *लोकसत्ता* तर्फे प्रदान करण्यात येणाऱ्या प्रतिष्ठित **"तरुण तेजांकित पुरस्कार २०२५"** ने गौरविण्यात आले. विविध क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या देशभरातील युवा व्यक्तींना सन्मानित करण्यासाठी दिला जाणारा हा मानाचा पुरस्कार यंदा डॉ. कदम यांच्या कार्याची दखल घेऊन प्रदान करण्यात आला आहे. मुंबई येथील *आयटीसी ग्रँड* येथे नुकत्याच पार पडलेल्या भव्य व दिमाखदार सोहळ्यात महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्यमंत्री मा. श्री. आशिष शेलार यांच्या हस्ते डॉ. कदम यांचा सन्मान करण्यात आला. या सोहळ्यास शिक्षण, उद्योग, प्रशासन तसेच संशोधन क्षेत्रातील अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली होती. कार्यक्रमात विविध क्षेत्रांतील गुणवंत तरुणांना गौरविण्यात आले असून, त्यामध्ये विज्ञान व संशोधन क्षेत्रातील योगदानासाठी डॉ. कदम यांची निवड विशेष ठरली.

डॉ. अभिजीत कदम हे सध्या सीएसएमएसएस छत्रपती शाहू अभियांत्रिकी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे भौतिकशास्त्र विभागात सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी ल्यूमिनेसेंट मटेरियल्स, फॉस्फर संशोधन तसेच सोलर सेल्स या क्षेत्रात सातत्याने संशोधन करत महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांच्या संशोधन कार्याची दखल राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर घेतली जात असून, त्यांनी प्रकाशित केलेले संशोधन लेख प्रतिष्ठित जर्नल्समध्ये प्रसिद्ध झाले आहेत.

"लोकसत्ता तरुण तेजांकित" हा पुरस्कार समाजातील विविध क्षेत्रांमध्ये नवनिर्मिती, नेतृत्व आणि उत्कृष्ट कार्य करणाऱ्या तरुणांना प्रोत्साहन देण्यासाठी दिला जातो. या पुरस्काराचा उद्देश केवळ सन्मान करणे नसून, समाजात सकारात्मक बदल घडविणाऱ्या आणि आपल्या कार्यातून इतरांसाठी प्रेरणादायी ठरणाऱ्या व्यक्तींना व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा आहे. त्यामुळे हा पुरस्कार तरुण पिढीसाठी एक प्रेरणास्त्रोत मानला जातो. डॉ. कदम यांच्या या यशामुळे छत्रपती संभाजीनगर शहराचे तसेच त्यांच्या संस्थेचे नाव राज्यस्तरावर उज्ज्वल झाले आहे. त्यांच्या संशोधन कार्यातून विज्ञान क्षेत्रात नवीन संधी निर्माण होत असून, विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची आवड वाढण्यासही मोठी मदत होत आहे. त्यांच्या या यशाबद्दल विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.